महावितरण

# महावितरण विद्युत वार्ता

☑ वर्ष १७ वे ☑ एप्रिल – मे २०२३

## हितगूज



आपल्या सर्वांसोबत महावितरण विद्युत वार्ताच्या व्यासपीठावरून संवाद साधतांना खूप आनंद होत आहे. महावितरणचा पदभार स्वीकारतांना माझा जास्तीत जास्त भर हा कंपनीचा आर्थिक डोलारा सुदृढ करण्यावर राहणार आहे. मागील काही दिवसांपासून राज्यातील अनेक भागात प्रचंड उष्णता वाढली असून विजेच्या मागणीतही वाढ झाली आहे. वाढणाऱ्या वीजमागणीनुसार विजेची उपलब्धता असावी यादृष्टीने लघुकालीन करार व पॉवर एक्सचेंजमधून वीजखरेदी करावी लागली. या अतिरिक्त वीजखरेदीमुळेही आपल्यावर आर्थिक भार वाढलेला आहे. या अतिरिक्त विजेच्या प्रत्येक युनिटचे पैशात रूपांतर करावे लागणार असून त्यासाठी सर्वांना झटावे लागणार आहे.

ग्राहक हा आपल्यासाठी अतिशय महत्वाचा घटक असून त्याला अखंडित व योग्य दाबाचा वीजपुरवठा मिळेल यासाठी आपल्याला जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागणार आहेत. ग्राहकांची कोणत्याही प्रकारची तक्रार असेल ती सोडवण्यावर आपला भर असायला पाहिजे. ग्राहकांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण सेवा मिळायलाच पाहिजे. ग्राहकांच्या तक्रारी आपल्यापर्यंत येणारच नाही यासाठी त्यांच्यासोबत संवाद साधणे गरजेचे आहे. तसेच त्यांच्या काही तक्रारी असल्यास त्या तक्रारींचे वेळेत निवारण करावे जेणेकरून आपली चांगली प्रतिमा त्यांच्या मनात निर्माण होऊन ग्राहक देखील समाधानाने वीजबिलांचा भरणा करतील. वीजबिलांचा भरणा वाढल्यास ग्राहकांच्या सुविधेसाठी ज्या विविध योजना आपण राबवित आहोत त्या वेळेत राबविण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध होईल. यासोबतच विविध देणी देण्यासही आपणास मदत होईल.

राज्य शासनाने शेतकरी बांधवांचे जीवन उजळणारी क्रांतीकारी अशी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० नुकतीच आणलेली आहे. या योजनेमुळे शेतीपंपांना दिवसा वीजपुरवठा मिळणार असून ग्रामीण विकासाला चालना मिळणार आहे. या योजनेमुळे रोजगाराची निर्मिती होणार आहेच पण यासोबतच राज्यात वीजनिर्मितीसाठी ३० हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. मा.उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी जुलै २०२२ मध्ये मिशन २०२५ निश्चित केले असून कृषी वाहिन्यांना सौर ऊर्जेद्वारे तयार झालेली वीज देण्यासाठी कृषी वीज वाहिन्या सौर ऊर्जेवर आणण्याचे निश्चित केले आहे. सौर ऊर्जा वापरून वीजनिर्मिती करायची व ती शेतकऱ्यांना द्यायची. शेतीसाठी दिवसा भरवशाची वीज मिळणार असल्याने अर्थकारणाला चालना मिळणार आहे. कृषिपंपासाठी किफायतशीर वीज मिळाल्यामुळे भविष्यात सरकारवरील अनुदानाचा बोजा कमी होणार आहे. भविष्यात क्रॉस सब्सीडीची गरज कमी झाल्याने उद्योग व व्यवसायांना स्पर्धात्मक दराने वीजपुरवठा मिळण्याची संधी मिळणार आहे. तसेच महावितरणची वीजहानी कमी होऊन आर्थिक भार कमी होणार आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागात सुमारे १९ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. या योजनेत शेतकऱ्यांना पडीक जमीन भाड्याने देऊन नियमित उत्पन्न मिळविण्याची संधी मिळणार आहे.

या योजनेच्या चांगल्या अंमलबजावणीसाठी आपल्या सर्वांचे सहकार्य अपेक्षित असून या योजनेचा जास्तीतजास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा यासाठी आपल्याला अधिक कार्यक्षमतेने प्रयत्न करण्याची गरज आहे. या योजनेचा शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला तर भविष्यात क्रॉस सब्सिडीची गरज कमी होऊन उद्योग व व्यवसायांना स्पर्धात्मक दराने वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे ही योजना अधिक गतीने व प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्वांनी कसोशीने प्रयत्न करावे.

केंद्र शासनाने सुधारित वितरण क्षेत्र योजना अंमलात आणली असून या योजनेअंतर्गत केंद्र शासनाद्वारे राज्यातील शासकीय वीज वितरण कंपन्यांना त्यांची कार्यक्षमता व आर्थिक स्थिरता सुधारण्याकरिता आर्थिक मदत मिळणार आहे. वीज वितरण पायाभूत सुविधांचे सक्षमीकरण व वीजपुरवठ्याची उपलब्धता व गुणवत्तेत सुधारणा करणे तसेच सशर्त आर्थिक सहाय्याद्वारे आर्थिक स्थिरता व संचालन कार्यक्षमतेत सुधारणा करणे आणि अत्याधुनिक स्मार्ट मिटरिंग करून वितरण हानी कमी करण्याच्या दृष्टीने ही योजना अतिशय महत्वाची ठरणार आहे. या योजनेद्वारे वीज ग्राहकांना दर्जेदार, विश्वासार्ह व वाजवी दराने वीजपुरवठा मिळणार आहे. २०२४-२५ या वर्षापर्यंत तांत्रिक व वाणिज्यिक हानी १२ ते १५ टक्क्यांपर्यंत कमी करणे तसेच २०२४-२५ या वर्षापर्यंत वीजपुरवठ्याची सरासरी किंमत आणि वीजपुरवठ्याचा सरासरी महसूल यामधील तफावत शून्यावर आणण्याचे उद्दीष्ट निर्धारित करण्यात आले आहे.

या योजनेमध्ये पुढील दोन वर्षात तांत्रिक व वाणिज्यिक हानी १३ टक्के कमी करावयाची असल्याने यामध्ये ४ हजार ७१२ कृषीप्रवण वीज वाहिन्यांचे विलगीकरण करण्यात येणार असून ९ हजार ८४३ किमी अतिभारीत वीज वाहिन्यांचे विभाजन करण्यात येणार आहे. १९ हजार ८८४ किमी वीज वाहिन्यांची क्षमतावाढ करण्यात येणार असून वीजचोरीचे प्रमाण जास्त असलेल्या भागात ३० हजार ३३२ किमी ऐरियलबंच केबलचा वापर करण्यात येणार आहे. तसेच ३ लाख ९८ हजार ८० मल्टी मीटर बॉक्स बसविण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे उच्चदाब वितरण प्रणालीमध्ये ५ हजार १७० रोहित्रे तर २ हजार ५१ उपकेंद्रांमध्ये कॅपेसिटर बसविण्यात येणार आहेत. सुमारे ४३ हजार कोटींच्या सुधारित वितरण क्षेत्र योजनेत केंद्र सरकारने सद्यस्थितीत २७ हजार ६९६ कोटी रूपयांची निधी मंजूर केला आहे. या योजनेतील काही कामांचे कार्यादेशही देण्यात आलेले असून काही कामांची निविदा प्रक्रिया सुरू आहे.

कायमचा वीजपुरवठा खंडित करण्यात आलेले ग्राहक, कृषिपंपधारक ग्राहक व शासकीय आस्थापनांच्या अखत्यारित असलेल्या सर्व प्रकारच्या ग्राहकांकडे एप्रिल २०२३ अखेर सुमारे ७४ हजार ९०८ कोटी रूपयांची थकबाकी आहे. एप्रिल महिन्यात ६ हजार ७४२ कोटी रूपये वसुलीचे उद्दीष्ट असतांना प्रत्यक्षात ६ हजार २६६ रूपयांची वसुली झाली आहे. वर्षातील काही ३-४ महिने सोडले तर उर्वरित महिन्यात ठरवून दिलेले वसुलीचे उद्दीष्ट पुरेशे साध्य होतांना दिसत नाही. विजेची विक्री व महसूल वसुलीचे उद्दीष्ट साध्य करीत असतांना आपणा सर्वांना जीव झोकून काम करावे लागणार आहे. वीजबिल वसुली ही आता कोणा एकाची जबाबदारी नसून ती सर्वच स्तरावरील अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांची असून यासाठी सर्वांनांच झटावे लागणार आहे. वीजबिल वसुली मोहीम यशस्वीपणे राबविण्यावरच आपले पुढील भवितव्य अवलंबून राहणार आहे. ग्राहकांना अचूक वीजबिल दिले पाहिजे जेणेकरून त्यांना आपल्या बिलात कोणताही दोष नाही याची खात्री होऊन मनात किंतूपरंतू न ठेवता ते आपले वीजबिल भरतील. सोबतच ग्राहकांना आपले वीजबिल ऑनलाईन भरण्यासाठी प्रवृत्त करणे गरजेचे असून यामुळे त्यांच्या वेळेची व पैशाची बचत होणार आहे. महावितरण ही माझी कंपनी असून तिला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी कष्ट घ्यावे लागणार आहेत हे ठरवून यापुढे आपल्याला कर्तव्य बजावावे लागणार आहे आणि आपण हे करणार याची मला खात्री आहे.

**श्री लोकेश चंद्र**

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

# महावितरणला सर्वोत्कृष्ट वीज वितरण कंपनीचा पुरस्कार



पुरस्कार स्वीकारताना अधीक्षक अभियंता श्री.निखिल मेश्राम, सोबत मान्यवर.

'इंडिपेंडंट पॉवर प्रोड्युसर्स असोसिएशन ऑफ इंडिया (आयपीपीआयए)' या वीज क्षेत्रातील अग्रगण्य संस्थेचा देशातील सर्वोत्कृष्ट वीज वितरण कंपनीचा पुरस्कार महावितरणला मिळाला असून याखेरीज ग्राहक जागृती, माहिती तंत्रज्ञानाचा कल्पक वापर आणि विजेच्या मीटरसाठी आधुनिक रेडिओ फ्रिक्वेन्सी तंत्रज्ञानाचा वापर केल्याबद्दल अन्य पुरस्कार मिळाले.

अधीक्षक अभियंता श्री. निखिल मेश्राम यांनी बेळगाव येथे एका समारंभात हे पुरस्कार कंपनीच्यावतीने नुकतेच स्वीकारले. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय विद्युत प्राधिकरणाचे अध्यक्ष श्री.घनश्याम प्रसाद, केंद्रीय विद्युत नियामक आयोगाचे माजी अध्यक्ष श्री. प्रमोद देव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे माजी अध्यक्ष श्री.व्ही.पी.राजा, आयपीपीएआयचे संचालक श्री. हॅरी धौल, हरयाणा विद्युत नियामक आयोगाचे माजी अध्यक्ष श्री.आर. एन. प्रशेर आणि इंडियन रिन्युएबल एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सीचे माजी संचालक श्री.चिंतन शाह उपस्थित होते.

महावितरणला ग्राहकांमध्ये जागृती निर्माण करणारी सर्वोत्कृष्ट वीज वितरण कंपनी म्हणूनही पुरस्कार मिळाला. याबाबतीत महावितरणचे ग्राहक कॉल सेंटर, तक्रारीसाठी टोल फ्रि नंबरची उपलब्धता, राज्यभरातील ग्राहक तक्रार निवारण केंद्रे, सौर ऊर्जेचा वापर करण्यासाठी ग्राहकांना केलेले मार्गदर्शन, वीज अपघात टाळण्यासाठी केलेली जागृती, ग्राहक मेळावे, ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी केलेला सोशल मीडिया तसेच वृत्तपत्रांचा व चॅनेल्सच्या माध्यमाचा वापर इत्यादींचा विचार करण्यात आला.

महावितरणने रेडिओ फ्रिक्वेन्सी आधारित मीटर रिडिंगचा वापर चालू केला आहे. राज्यात ९४ लाख मीटरच्या बाबतीत अशी सुविधा सुरू केली असून ही संख्या वाढत आहे. या व्यवस्थेत रेडिओ फ्रिक्वेन्सीचा वापर करून विजेच्या मीटर्सचे अचूक रिडिंग घेता येते. यामुळे बिले अचूक देण्यास मदत होते तसेच वीज वापराची माहिती चांगल्या रितीने उपलब्ध होते. आगामी काळात राज्यातील ग्राहकांना स्मार्ट मीटर देण्यात येणार आहेत.

तसेच, महावितरणने आपल्या कामात माहिती तंत्रज्ञानाचा अत्यंत कल्पकतेने व व्यापक उपयोग केला आहे. महावितरणने विकसित केलेले मोबाईल ॲप्लिकेशन, एसएमएस अलर्ट व्यवस्था, रोख भरणा केंद्रांना ऑनलाईन जोडणे, 'महा पॉवर पे', हे स्वतःचे ई वॉलेट विकसित करणे तसेच तक्रार निवारणासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर यांचा विचार पुरस्कार देताना करण्यात आला. कंपनीला 'इनोव्हेटीव्ह आयटी ॲप्लिकेशन्स इन पॉवर सेक्टर' या गटातही पुरस्कार मिळाला.

◆◆◆

# महावितरणला 'सौर ऊर्जे'तील कामगिरीबद्दल पुरस्कार




'सूर्याकॉन' परिषदेमध्ये मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार व डॉ. संतोष पटनी यांना पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांना वेग देण्यासाठी सुरु असलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महावितरणसह पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार व पुणे लघु प्रशिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष पटनी यांना पुणे येथे झालेल्या 'सूर्याकॉन' परिषदेमध्ये गौरविण्यात आले.

सौर ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ व प्रतिनिधींची एकदिवसीय 'सूर्याकॉन' परिषद पुणे येथे नुकतीच आयोजित करण्यात आली. तीत महाराष्ट्र वार्षिक सौर पुरस्कार-२०२३चा सोहळा उत्साहात झाला. या परिषदेचे उद्घाटन महावितरणचे प्रादेशिक संचालक श्री. अंकुश नाळे यांच्या हस्ते झाले. त्यानंतर अपारंपरिक ऊर्जा व भविष्यातील वाटचालीबाबत तीन चर्चासत्र आयोजित करण्यात आले. यामध्ये केंद्र व महाराष्ट्र शासनाचे अपारंपरिक ऊर्जा धोरण आणि महावितरणचा सहभाग या विषयावर चर्चा झाली. या चर्चासत्रात महावितरणकडून सौर ऊर्जा प्रकल्पांबाबत शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, सौर ऊर्जा प्रकल्पांना गती देण्यासाठी सुरू असलेले विशेष प्रयत्न, ग्राहक प्रबोधन व जनजागरण, तत्पर सेवा तसेच समाजमाध्यमांचा वापर आदींबाबत माहिती देण्यात आली.

महावितरणच्या विविध उपक्रमांमुळे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांना ग्राहकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. या कार्याची दखल घेत 'सूर्याकॉन' परिषदेमध्ये 'इझ ऑफ डूइंग बिजीनेस फॉर सोलर एजन्सीज' या श्रेणीत महावितरणला पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच 'लिडरशिप इन पॉलिसी एक्सलेंस' या श्रेणीत पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार व पुणे लघु प्रशिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष पटनी यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले.

ग्रीन एनर्जीला प्राधान्य देत महावितरणच्या पुणे परिमंडलाकडून सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पांना वेग देण्यात आला आहे. त्यासाठी गणेशखिंड येथील विश्रामगृहाच्या छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारून त्याद्वारे पुणे परिमंडलातील अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. सोबतच सौर ऊर्जा प्रकल्पाची उभारणी करणाऱ्या एजन्सीजच्या प्रतिनिधींना सर्व तांत्रिक व 'ऑनलाइन' प्रशासकीय कार्यवाहीची माहिती देण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येत आहे. यासह सौर ऊर्जा प्रकल्पांच्या उभारणीसाठी वीजग्राहकांना इत्यंभूत माहिती देण्यासाठी तसेच विविध शंका निरसनासाठी पुणे परिमंडलाकडून ध्वनीचित्रफीत तयार करण्यात आल्या आहेत व त्या महावितरणच्या सर्व समाजमाध्यमांवर प्रसारित करण्यात आल्या आहेत.

◆◆◆

# अचलपूर विभागात ग्राहक सेवेतील यशस्वी ५० वर्षांचा महोत्सव



अचलपूर विभागात ग्राहकसेवेचा महोत्सवप्रसंगी उपस्थित अधिकारी व कर्मचारी.

अमरावती परिमंडलातील अचलपूर विभागाने आपल्या ग्राहक सेवेची यशस्वी ५० वर्षे पुर्ण केल्याबद्दल अचलपूर विभागाचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यात आला.

विभागीय कार्यालय अचलपूर येथे नुकतेच सुवर्ण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विभागाच्या विकासात योगदान देणारे तत्कालीन कार्यकारी अभियंते सर्वश्री अजय खोब्रागडे, राजेंद्र गीरी, दिपक अघाव, भारतभूषण औघड यांचीही या कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थिती होती.

याप्रसंगी कार्यकारी अभियंता श्री. संजय शृंगारे म्हणाले की, १९७३ साली तत्कालीन वीज मंडळात स्थापन झालेल्या अचलपूर विभागाचा विस्तार हा सहा तालुक्यात आहे. या विभागाने मेळघाट कुशीत घेतल्याने भौगोलिक परिस्थितीनुसार आलेली आव्हाने सर केलीत. मिश्र ग्राहक संख्या, सर्वाधिक वितरण केंद्रे असलेल्या या विभागाने मेळघाट-जरीदा सारख्या आदिवासी बहुल भागात सेवा देताना सेवेत खंड पडू दिला नाही याचे श्रेय या विभागाला योगदान देणाऱ्या सर्व जनमित्रांना जाते. काम करतांना सुरक्षेला महत्व देण्याचे आवाहन कार्यकारी अभियंता श्री.भारतभूषण औघड यांनी केले. श्री.राजेश तीवारी यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

सुवर्ण महोत्सव दिनानिमित्त जनमित्रांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी घेण्यात आलेल्या रक्तदान शिबीराला जनमित्रांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. तसेच अचलपूर विभागातील सर्व जनमित्रांना यावेळी पुष्प देऊन गौरव करण्यात आला. यावेळी जनमित्र श्री. राजेश बूराडे आणि कु. श्वेता विखार यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपकार्यकारी अभियंते सर्वश्री चेतन मोहोकार व विनय लव्हाळे यांनी केले. सुत्रसंचालन सर्वश्री. अभिजित सदावर्ती, निलेश मानकर व वंदना भलावी यांनी केले, तर आभार उपकार्यकारी अभियंता श्री.जयंत घाटे व सहाय्यक अभियंता श्री.राजेश जरोदे यांनी मानले. या कार्यक्रमाला विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

◆◆◆

# कोल्हापूर व सांगलीच्या भरारी पथकांचा सन्मान



गौरवपत्र स्वीकारताना कोल्हापूर व सांगली भरारी पथकातील अधिकारी.

सुरक्षा व अंमलबजावणी विभागाच्या पुणे परिक्षेत्राअंतर्गत कार्यरत कोल्हापूर व सांगली येथील भरारी पथकाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांचा एप्रिल २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत वीजचोरी रोखण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल गौरव प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. मुख्य अभियंता श्री. परेश भागवत यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

कोल्हापूर भरारी पथकातील अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. राकेश मगर, सहाय्यक अभियंता श्री. नितीन जोशी, सहाय्यक सुरक्षा व अंमलबजावणी अधिकारी श्रीमती वर्षा जाधव, उच्चस्तर लिपीक श्रीमती प्राजक्ता जाधव, वरिष्ठ तंत्रज्ञ सर्वश्री राजेंद्र कोरवी व निखिल कांबळे यांचा सन्मान करण्यात आला. सांगली भरारी पथकातील अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. महेशकुमार राऊत, सहाय्यक सुरक्षा व अंमलबजावणी अधिकारी श्रीमती चैत्रा पै, उच्चस्तर लिपीक श्रीमती प्रिया बने, वरिष्ठ तंत्रज्ञ सर्वश्री वसंत सकटे व अमित नारे यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. शशिकांत पाटील, कार्यकारी अभियंते सर्वश्री अभिजित सिकनीस, गोविंद वरपे, सुधाकर जाधव, सुनिल शिंदे, सुनिलकुमार माने, दिपक पाटील, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भुपेंद्र वाघमारे आदी उपस्थित होते.

◆◆◆

# चि. श्रीवल्लभ चिखलकर यांची लेफ्टनेंट पदी निवड



लेफ्टनेंट चि. श्रीवल्लभ नारायण चिखलकर

भारतीय सैन्य दलात उच्च पदस्थ अधिकारी व्हायचं स्वप्न उराशी बाळगणाऱ्या चि. श्रीवल्लभ नारायण चिखलकर यांची ध्येय, प्रचंड इच्छाशक्ति, कठोर परिश्रमानंतर भारतीय सैन्य दलात लेफ्टनेंट या उच्च अधिकारी पदावर वयाच्या २३ व्या वर्षी निवड झाली आहे. निम्नस्तर लिपीक म्हणून अमरावती परिमंडल येथे ग्राहक तक्रार निवारण मंच या कार्यालयात कार्यरत असलेल्या श्रीमती पल्लवी नारायण चिखलकर(वैशाली अग्नीहोत्री) यांचा चि. श्रीवल्लभ हा मुलगा आहे.

श्रीवल्लभने आपले अकरावी व बारावीचे शिक्षण राज्य सरकारचे सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था औरंगाबाद येथे पूर्ण केले. तर, शिवाजी शिक्षण महाविद्यालयातून विज्ञान शाखेतून पदवी घेतली.जलतरण स्पर्धेत त्याने देशाचे नेतृत्वही केले आहे. दरम्यान, इंडियन मिलिट्री ॲकॅडमीमध्ये स्वत:चा आगळा- वेगळा जलतरण रेकॉर्ड ही त्याने स्थापित केला.२०१९ मध्ये झालेल्या आशिया कप स्पर्धेत ट्रायथलॉन या खेळात देशाचे नेतृत्व करून एक रौप्य आणि एका कांस्य पदकाने शिरपेचात मानाचा तुरा खोवला.

केंद्रीय लोकसेवा आयोगाव्दारे घेतल्या जाणाऱ्या कंम्बाईन डिफेन्स सर्व्हीसेसची लेखी परीक्षा, वैद्यकीय चाचणी व पाच दिवसाच्या अतिशय खडतर मुलाखतीचा यशस्वी प्रवास ओलांडत देशात ४७ वा क्रमांक पटकाविला. सद्यस्थितीत लेफ्टनेंट चि. श्रीवल्लभ नारायण चिखलकर हा,गोरखा रेजिमेंट, येथे देशसेवेत कार्यरत आहे.

श्रीमती पल्लवी चिखलकर या मुळात खेळाडू आहे. त्या एरोबिक या क्रीडा प्रकाराच्या राष्ट्रीय परिक्षक देखील आहेत.

◆◆◆

# लातूर परिमंडलात डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त शालेय साहित्याचे वाटप




विद्यार्थांना शालेय साहित्य वाटप करताना मान्यवर.

लातूर परिमंडल कार्यालय परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करून मुख्य अभियंता श्री. सुंदर लटपटे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. शिवाय, दारिद्र्य रेषेखालील वीस नागरिकांना विजेच्या मोफत जोडण्याही देण्यात आल्या. त्यांचाही प्रातिनिधीक स्वरुपात व्यासपीठावर सत्कार करण्यात आला.

ज्येष्ठ इतिहास तज्ञ डॉ. श्री. अनंत दारवटकर यांचे यावेळी हिन्दु कोड-बील या विषयावर व्याख्यान झाले. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सुंदर लटपटे उपस्थित होते. मानव संसाधन विभागाचे सहायक महाव्यवस्थापक श्री. चंद्रकांत खाडे, कार्यकारी अभियंते सर्वश्री बी. जी. शेंडगे, प्रदीप पुनसे, गणेश सामसे, शिवाजी वाडेकर, व्यवस्थापक सर्वश्री विकास कांबळे व संजय खाडे यांचीही कार्यक्रमास उपस्थिती होती.

◆◆◆

# नाशिक परिमंडलात स्वच्छता दुतांचा गौरव



विद्युतभवन येथे स्वच्छतादुतांचा गौरव करतांना उपस्थित अधिकारी व कर्मचारी

नाशिक परिमंडल कार्यालयात मुख्य अभियंता श्री. दिपक कुमठेकर यांच्या संकल्पनेतून आयोजित कार्यक्रमात विद्युतभवन तथा परिसर स्वच्छतेसाठी कार्यरत असणारे सर्व सफाई कर्मचारी म्हणजेच स्वच्छता दूतांचा गौरव करण्यात आला. नाशिक परिमंडलातील सर्व विभाग प्रमुख यांच्याहस्ते भेटवस्तू व पुष्प देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तत्पूर्वी जयंतीनिमित्त संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी सर्वश्री सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) महेश बुरंगे व सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) लक्ष्मण वसावे, कार्यकारी अभियंता श्री. धनंजय आहेर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. प्रमोद राजे भोसले, सहाय्यक विधी अधिकारी श्री. रणजीत बोम्मी यांच्यासह परिमंडलातील सर्व स्वच्छता दूत आणि अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जनसंपर्क अधिकारी श्री. विकास आढे यांनी केले.

◆◆◆

# नागपूर परिमंडलात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी




विचार, तत्व, प्रणाली यांना कुस्करून केवळ व्यवहारवादाचे स्तोम वाजविण्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कडाडून विरोध केला होता. आज समाजात नेमके तेच दिसत आहे. आजच्या व्यवहारवादाने इष्ट अनिष्ट कोणतेच वस्त्र अंगावर ठेवलेले नाही. अशा पद्धतीने विचारसरणीची लढाई लढायला सारेच दुबळे ठरत असतील तर हा नव्या अंधार युगाचा प्रारंभ म्हणता येईल, असे परखड मत ज्येष्ठ पत्रकार व आंबेडकरी विचारवंत प्रा. श्री. रणजित मेश्राम यांनी व्यक्त केले.

परिमंडलातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून प्रा.श्री. रणजित मेश्राम बोलत होते. अध्यक्षस्थानी महावितरणचे प्रादेशिक संचालक श्री. सुहास रंगारी होते. श्री. रणजित मेश्राम यांनी आर्थिक संरचनेला मुलभूत अधिकारात घ्यावे या बाबासाहेबांच्या वारंवारच्या आग्रहाकडे या देशाने दुर्लक्ष केले. अशा बऱ्याच अनुल्लेखित व दुर्लक्षित घटनांचा आपल्या भाषणातून आढावा घेतला. यावेळी मंचावर मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके प्रामुख्याने उपस्थित होते.

अध्यक्षस्थानावरुन बोलताना श्री. सुहास रंगारी यांनी प्रजा व नागरिक यातील भेद स्पष्ट केला. शिवाय, विविध प्रसंग व उदाहरणे सांगून बाबासाहेबांप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली. याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके यांचेही समयोचित भाषण झाले. यावेळी खगोलशास्त्रावर आधारित व्हॉट इफ स्पेसचा लेखक श्री. सिद्धांत सुशांत शृंगारे याचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. शरद दाहेदार, अधीक्षक अभियंते सर्वश्री अमित परांजपे, अविनाश सहारे, अजय खोब्रागडे, हरिष गजबे, नारायण लोखंडे , कार्यकारी अभियंते सर्वश्री हेमराज ढोके, राजेश घाटोळे, समीर टेकाडे, राहुल जीवतोडे, प्रफूल्ल लांडे, बी.ए. हिवरकर, रुपेश टेंभुर्णे व सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. मधुसूदन मराठे हे आवर्जून उपस्थित होते. प्रास्ताविक श्री.सुशांत श्रृंगारे, संचालन श्री. बंडू शंभरकर व आभार प्रदर्शन श्रीमती निशा चौधरी यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने कर्मचारी उपस्थित होती.

◆◆◆

# केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या दिल्लीतील कार्यक्रमात श्री. केदार कुलकर्णी व श्री. प्रदीप पवार यांचा गौरव



गौरवप्रसंगी मान्यवरांच्या सोबत श्री. केदार कुलकर्णी व श्री. प्रदीप पवार

लाईनमन दिवसाच्या औचित्याने दिल्ली येथे केंद्रीय विद्युत प्राधिकरणच्यावतीने आयोजित कार्यक्रमात प्राधिकरण अध्यक्ष श्री. घनश्याम प्रसाद यांचे हस्ते सांगली शहर विभागातील सहाय्यक अभियंता श्री. केदार कुलकर्णी व लाईनमन श्री. प्रदीप पवार यांचा सन्मान करण्यात आला. याबद्दल मुख्य अभियंता श्री. परेश भागवत, अधीक्षक अभियंता श्री. धर्मराज पेठकर, कार्यकारी अभियंता श्री. अप्पासो खांडेकर यांनी दोघांचेही अभिनंदन केले.

◆◆◆

# कु. वैशाली के. थूल हिला राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेत कांस्य




इच्छा प्रबळ असली तर काहीही अशक्य नसते याची प्रचिती महावितरणच्या चंद्रपूर येथील दिव्यांग कर्मचारी कु. वैशाली के. थूल यांनी आणून दिली. राष्ट्रीय व्हीलचेअर तलवारबाजी असोसिएशन हरियाणाव्दारे करण स्टेडियम, करनाल, हरियाणा येथे आयोजित राष्ट्रीय व्हीलचेअर तलवारबाजी स्पर्धा २०२३ या स्पर्धेत महिला गटातील तलवारबाजी फॉईल (FOIL) या क्रीडा प्रकारात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करीत कु. वैशालीने कांस्य पदक पटकाविले आहे.

कु. वैशाली के थूल, चंद्रपूर मंडलात उच्चस्तर लिपिक (मा.सं.) या पदावर कार्यरत आहेत. आपल्या रोजच्या धकाधकीच्या जीवनात सुद्धा त्यांनी आपली आवड जपली आहे. याआधी २०१९ मध्ये मणिपूर येथे पार पडलेल्या राष्ट्रीय व्हीलचेअर तलवारबाजी स्पर्धेत देखील वैशालीने कांस्य पदक पटकावले होते. वैशालीला महाराष्ट्र राज्याचा एकलव्य राज्य क्रीडा पुरस्कार मिळाला असून विविध क्रीडा प्रकारात अस्टपैलू असलेल्या वैशालीने २००७ पासून टेबल टेनिस, ॲथ्लेटीक्स व तलवारीबाजी प्रकारात आजपर्यंत एकूण १७ पदके मिळवली आहे. यात ३ सुवर्ण पदके, ७ रजत व ७ कांस्य पदकांचा समावेश आहे. सर्वासाठी प्रेरणादायक असा हा कु. वैशालीचा प्रवास कौतुकास्पद असाच आहे.

वैशालीच्या या कामगिरीचे चंद्रपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सुनील देशपांडे, चंद्रपूर मंडलाच्या अधीक्षक अभियंत्या श्रीमती. संध्या चिवंडे, सहा. महाव्यवस्थापक(मा.सं.) श्री. रामचंद्र वैदकर, वरिष्ठ व्यवस्थापक(मा.सं.) श्री. सुशिल विखार, कार्यकारी अभियंता (प्रशा.) श्रीमती ईशा गेडाम, उपविधी अधिकारी श्री. शैलेंद्र फुले, कार्यकारी अभियंता (प्रशा.) श्री. विजय राठोड, वरिष्ठ व्यवस्थापक (वि.व.ले.) श्री. राकेश बोरीवार यांचेसह सर्व अभियंता, अधिकारी आणि कर्मचारी यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## सौर ऊर्जा प्रकल्पांच्या एजन्सीसाठी पुण्यात कार्यशाळा



**गणेशखिंड येथील लघु प्रशिक्षण केंद्रात सौर ऊर्जा प्रकल्प एजन्सीच्या प्रतिनिधींना प्रशिक्षण देण्यासाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.**

छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाची उभारणी करणाऱ्या एजन्सीच्या प्रतिनिधींना सर्व तांत्रिक व 'ऑनलाईन' प्रशासकीय कार्यवाहीची माहिती देण्यासाठी पुणे परिमंडलामध्ये नुकतेच कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सौर ऊर्जा प्रकल्पाची उभारणी करणाऱ्या महावितरणच्या निवड सूचीवरील एजन्सीच्या प्रतिनिधींना प्रशिक्षण देण्यात यावे अशी विनंती महाराष्ट्र सोलर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने (मास्मा) मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांच्याकडे केली होती.

गणेशखिंड येथील महावितरणच्या लघु प्रशिक्षण केंद्रामध्ये झालेल्या एकदिवसीय कार्यशाळेत मुंबई मुख्यालयातील कार्यकारी अभियंता श्री. शरद बंड व सहायक अभियंता इकबाल खुर्शिद यांची व्याख्याते म्हणून उपस्थिती होती. त्यांनी पुणे, कोल्हापूर व सांगली येथील ४५ एजन्सीच्या प्रतिनिधींना प्रशिक्षणासह 'ऑनलाईन' प्रशासकीय कार्यवाहीची सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती दिली. तसेच संबंधित प्रश्नांचे निराकरण केले. या कार्यशाळेच्या आयोजनासाठी लघु प्रशिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष पटनी यांनी पुढाकार घेतला. 'मास्मा'चे अध्यक्ष श्री. रोहन उपासनी व पदाधिकारी या कार्यशाळेला उपस्थित होते.

ग्रीन एनर्जीला प्राधान्य देत वीजग्राहकांकडून प्रामुख्याने छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. गणेशखिंड येथील विश्रामगृहाच्या छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारण्यात आला असून त्याद्वारे पुणे परिमंडलातील अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रशिक्षणामुळे सौर ऊर्जा प्रकल्पांना आणखी गती मिळेल व ग्राहकांना तत्पर सेवा मिळेल असा विश्वास कार्यशाळेतील प्रशिक्षणार्थींनी व्यक्त केला.

## राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत स्वनील आंबेकर यांना तीन सुवर्ण पदके



पाचव्या राष्ट्रीय मास्टर्स गेम्स जलतरण स्पर्धेत नाशिक रोड उपविभागामध्ये वरिष्ठ लिपिक (विवले) पदावर कार्यरत असलेले श्री. स्वनिल आंबेकर यांनी तीन सुवर्णपदके पटकावली आहेत. त्यांच्या या दैदीप्यमान कामगिरीबद्दल नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दिपक कुमठेकर यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी नाशिक मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. ज्ञानदेव पडळकर, कार्यकारी अभियंता श्री. धनंजय आहेर यांचेसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. स्वप्नील आंबेकर यांनी यापूर्वीसुद्धा राष्ट्रीय जलतरणच्या वॉटर पोलो, शॉर्ट व लाँग डिस्टन्स स्पर्धेत अनेक पदके मिळविलेली आहेत.

## तोशल चिंचोलीकर हीचे रोलर स्केटींग स्पर्धेत यश



कु. तोशल चिंचोलीकर

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने आयोजित दक्षिण विभाग रोलर स्केटींग चॅम्पियनशिप २०२२ मध्ये कु. तोशल चिंचोलीकर हीने ३०० मीटर (टाईम ट्रायल) प्रकारात रौप्यपदक पटकाविले. कर्नाटकातील बेळगाव येथील बी. जी. हांजी इंटरनॅशनल स्कूलमध्ये नुकतीच ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, केरळ व तामिळनाडू या राज्यातील १४०० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. जानेवारी २०२३ मध्ये हरियाणातील गुरूग्रामच्या राष्ट्रीय स्पर्धेत कु. तोशल सहभागी झाली होती.

कु. तोशल चिंचोलीकर कोल्हापुरातील संजीवन इंग्लिश मिडियम स्कुलची इयत्ता सहावीची विद्यार्थीनी आहे. महावितरण कंपनीत सहाय्यक अभियंता पदावर कार्यरत श्री. शैलेश चिंचोलीकर यांची ती कन्या आहे.

# विद्युत उपकेंद्राच्या जमिनीसाठी केवळ एक रुपयाचा मोबदला

## अहमदनगर स्मॉल अँड मिडीयम स्केल इंड्रस्टीज अँड ट्रेड असोसिएशनची सामाजिक बांधिलकी



**संतोष बोथरा यांचा सन्मान करताना मुख्य अभियंता श्री. दिपक कुमठेकर व उपस्थित अधिकारी.**

जमिनीला सोन्याचा भाव असताना अहमदनगर जिल्ह्यातील मौजे भाळवणी (ता. पारनेर) येथील प्रस्तावित विद्युत उपकेंद्रासाठी एक एकर जमीन नाममात्र केवळ एक रुपयाचा मोबदला घेऊन अहमदनगर स्मॉल अँड मिडीयम स्केल इंड्रस्टीज अँड ट्रेड असोसिएशनचे बोथरा परिवार यांनी सहृदयतेचा परिचय देत औद्योगिक परिसरातील तथा घरगुती ग्राहक व शेतकऱ्यांचे जीवनमान प्रकाशमय करण्याची सामाजिक बांधिलकी जपली आहे. या विद्युत उपकेंद्रामुळे येथील औद्योगिक परिसरातील तथा गावांमध्ये हजारो नवीन वीजजोडण्यांसह सुरळीत व योग्य दाबाने वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे.

अहमदनगर मंडलातील अहमदनगर शहर तथा ग्रामिण विभागाच्या पारनेर उपविभागअंतर्गत सुधारीत वितरण क्षेत्र योजना (RDSS) या योजनेमधून भाळवणी येथे ३३/११ केव्ही उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आले आहे. मात्र या उपकेंद्रासाठी प्रयत्न करूनही महावितरणला योग्य ठिकाणी जमीन मिळण्यास अडचण निर्माण झाली होती, परिणामी उपकेंद्राच्या उभारणीसाठी विलंब होत होता.

याच परिसरातील अहमदनगर स्मॉल अँड मिडीयम स्केल इंड्रस्टीज अँड ट्रेड असोसिएशन यांच्या संचालकांशी महावितरणने संपर्क साधून जमिनीची उपकेंद्रासाठी निकड असल्याचे सांगितले. संचालक तथा जमीनमालक बोथरा परिवार यांनी या उपकेंद्राची संपूर्ण माहिती घेतली आणि नाममात्र केवळ एक रुपयाच्या मोबदल्यात दीड एकर स्वमालकीची जमीन उपकेंद्रासाठी देण्याचा निर्णय घेतला.

नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दिपक कुमठेकर यांनी प्रातिनिधिक स्वरूपात अहमदनगर स्मॉल अँड मिडीयम स्केल इंड्रस्टीज अँड ट्रेड असोसिएशनचे संचालक श्री. संतोष बोथरा यांचा विद्युत भवन, अहमदनगर येथे कृतज्ञतापूर्वक गौरव केला व आभार मानले. प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. कैलास जमदाडे, कार्यकारी अभियंता श्री. दीपक लहामगे व अहमदनगर स्थापत्य उपविभागाच्या अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्रीमती बबिता खोब्रागडे यांनी जमीन हस्तांतरणाच्या कामात सहकार्य केले.

◆◆◆

# दारव्हा विभागीय कार्यालयाच्या निर्मितीमुळे ग्राहकांना मिळतील दर्जेदार सेवा - पालकमंत्री श्री. संजय राठोड



**दारव्हा येथील नवनिर्मित विभागीय कार्यालयाच्या उद्घाटनाप्रसंगी अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. संजय राठोड सोबत प्रादेशिक संचालक श्री. सुहास रंगारी व इतर मान्यवर**

परिसरातील शेतकरी, घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक अशा सर्वच प्रकारच्या ग्राहकांच्या सोयीसाठी दारव्हा येथे नविन विभागीय कार्यालयाची निर्मिती करण्यात आली आहे. स्वतंत्र फिल्टर युनिट, कार्यकारी अभियंतासहीत ३६ नविन अधिकारी, कर्मचारी दारव्हा विभागाला अतिरिक्त मिळाल्याने ग्राहकांना अधिक चांगली वीजसेवा मिळेल असे प्रतिपादन अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. संजय राठोड यांनी केले.

गोदावरी नगर, दारव्हा येथील पार पडलेल्या नवीन विभागीय कार्यालयाच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी महावितरणचे प्रादेशिक संचालक सुहास रंगारी,मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी, अधीक्षक अभियंते सर्वश्री सुरेश मडावी, दिपक देवहाते, गटविकास अधिकारी राजीव शिंदे, प्रा.अजय दुबे, राजीव पाटील, वैशाली मसाळ, बबनराव इर्वे, विनोद जाधव, मनोज सिंगी, संतोष चव्हाण, काजी आणि यशवंत पवार उपस्थित होते.

यावेळी बोलतांना पालकमंत्री म्हणाले, यापूर्वी ग्राहकांना तक्रारीसाठी किंवा महावितरणच्या विविध कामासाठी पुसद येथील कार्यकारी अभियंता कार्यालयात जावे लागत होते. परंतु, आता विभागीय कार्यालयाच्या निर्मितीमुळे याचा फायदा विभागातील ३४ हजार शेतकरी व इतर १ लाख ३५ हजार ग्राहकांना होणार आहे. या विभागात ३३/११ केव्हीची २४ उपकेंद्रे कार्यरत असून आर.डी.डी.एस. योजनेत आणखी ६ उपकेंद्रे प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच ७ उपकेंद्राची ५ एमव्हीएने क्षमता वाढ करण्यासोबतच पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढ करण्यात येणार असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

याप्रसंगी बोलतांना प्रादेशिक संचालक श्री. रंगारी म्हणाले, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० हा महाराष्ट्र शासनाचा महत्वाकांक्षी प्रकल्प असून या योजनेत सौर प्रकल्प उभारून २०२५ पर्यंत शेतकऱ्यांना दिवसाला वीज पुरवठा देण्याचा शासनाचा मानस आहे. तर ग्राहकाभिमूख सेवा देण्यावर महावितरणचा भर राहणार असल्याचे मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी म्हणाले.

◆◆◆

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेतून कायद्याचे राज्य निर्माण केले - प्रा. प्रकाश पवार

रक्ताचा एक थेंबही न सांडवता आणि हिंसेला कुठेही स्थान न देता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हजारो वर्षांची गुलामगिरी संपुष्टात आणली. भारतातील प्रत्येक माणसाला जगण्याचा समान अधिकार व मूलभूत हक्कांचे स्वातंत्र्य लोकशाहीच्या माध्यमातून बहाल केले आणि ते अबाधित ठेवण्यासाठी राज्यघटनेतून कायद्याचे राज्य निर्माण केले असे प्रतिपादन ज्येष्ठ वक्ते व फर्ग्युसन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. श्री. प्रकाश मारूती पवार यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महावितरण व महापारेषणमधील उत्सव समितीच्यावतीने पुण्यातील रास्तापेठ येथे आयोजित कार्यक्रमात प्रा. प्रकाश पवार बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापारेषणचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र गायकवाड होते. प्रमुख पाहुणे म्हणून महावितरणचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार तर व्यासपीठावर अधीक्षक अभियंते सर्वश्री सतीश राजदीप, सतीश गायकवाड, जयवंत कुलकर्णी, प्रमोद भोसले यांची उपस्थिती होती.

प्रा. प्रकाश पवार म्हणाले की, 'भारतरत्न डॉ. आंबेडकर यांनी खऱ्या अर्थाने भारताची एक प्रजासत्ताक व सार्वभौम राष्ट्र म्हणून उभारणी केली. समता प्रस्थापित केली. धर्म, पंथ, जातीपातीला थारा न देता आम्ही सर्व भारताचे लोक अशी प्रत्येकास नवी ओळख दिली. प्रत्येकास समान अधिकार व हक्क दिले.' यावेळी मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार म्हणाले, 'भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या ज्ञानसंपन्नतेच्या जोरावरच भारताचा आर्थिक व सामाजिक विकास झाला आहे, प्रगती झाली आहे. विविध क्षेत्रातील उत्तुंग भरारीसाठी योग्य दिशा मिळाली आहे. त्यांच्यामुळेच तळागाळातील सर्वसामान्य माणूस मानसिक गुलामगिरीतून मुक्त झाला आहे.' डॉ. आंबेडकर यांनी विविध क्षेत्राचे अभ्यासक व तज्ज्ञ म्हणून देश उभारणीत दिलेल्या ऐतिहासिक




**रास्तापेठ येथे आयोजित डॉ. आंबेडकर जयंती कार्यक्रमात बोलताना प्रा. प्रकाश पवार. यावेळी मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार (महावितरण) व श्री. राजेंद्र गायकवाड (महापारेषण) उपस्थित होते.**

योगदानाची माहिती यावेळी मुख्य अभियंता श्री. पवार यांनी दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब शिंदे यांनी केले तर श्री. भरत मुंडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला महावितरण व महापारेषणचे अभियंता, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयोजनासाठी सर्व कर्मचारी संघटनांच्या संयुक्त उत्सव समितीने पुढाकार घेतला.

◆◆◆

# महावितरणची समाज माध्यमांवर घोडदौड

आजच्या आधुनिक युगात माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला असून आज समाज माध्यम हे संपर्काचे अतिशय प्रभावी साधन ठरत आहे. सोशल मिडियावर राबविलेल्या जनसंपर्काची लोकप्रियता दिवसागणिक वाढत आहे. या माध्यमांत महावितरणच्या सक्रिय सहभागामुळे कंपनीची ध्येय धोरणे, सकारात्मक ग्राहक सेवा आणि योजना तळगाळातील गरजू व ग्राहकांपर्यंत पोहचविण्यासाठी अतिशय विधायक ठरत आहे.

या समाज माध्यमांव्दारे आपल्या सर्वांना शैक्षणिक, सर्जनशील, कलात्मक, संप्रेषण आणि मनोरंजनाच्या संधी आहेत आणि महावितरण परिवाराचा एक भाग म्हणून आपण प्रत्येकाने महावितरणच्या या सोशल मिडीयावरील प्रत्येक प्लॅट्फॉर्मवर सक्रिय असणे आवश्यक आहे. किमान महावितरणच्या फ़ेसबुक, ट्वीटर, इंस्टाग्राम आणि युट्यूबच्या अकाऊंटवरील पोस्टला लाईक, शेअर आणि सबस्क्राईब करुन महावितरणच्या या समाजाभिमुख कार्याचा प्रचार-प्रसार करण्यास सहकार्य करावे.

**महावितरणच्या विविध समाजमाध्यमांच्या लिंक्स पुढिलप्रमाणे आहेत. १.**

1. ट्वीटर - https://twitter.com/MSEDCL?t=oLUxLfKMMq_nJFSE1Tkyvw&s=08
2. फ़ेसबुक - https://www.facebook.com/MSEDCL?mibextid=ZbWKwL
3. इंस्टाग्राम - https://instagram.com/msedclofficial?igshid=NTc4MTIwNjQ2YQ==
4. युट्यूब - https://youtube.com/@mahavitaranofficial

# 'शासन आपल्या दारी' अभियानात ३५० वीज जोडण्या



**ग्राहकांना वीज मीटरचे वाटप करताना अधीक्षक अभियंता श्री. गौतम गायकवाड, कार्यकारी अभियंता श्री. रविंद्र बुंदेले यांचेसह अधिकारी व कर्मचारी**

शासनाच्या विविध योजना जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य शासनातर्फे सुरू करण्यात आलेल्या 'शासन आपल्या दारी' अभियानाचा शुभारंभ मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सातारा जिल्ह्यातील दौलतनगर (मरळी) येथे करण्यात आला. याप्रसंगी महावितरणतर्फे ३५० नागरिकांना वीजमीटरचे वाटप करुन जोडणी देण्यात आलेली आहे. दौलतनगर येथील श्रीमती विजयादेवी देसाई विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय परिसरात आयोजित कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेसह, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, फलोत्पादन मंत्री श्री. संदीपान भुमरे, उद्योगमंत्री श्री. उदय सामंत, उत्पादन शुल्क मंत्री श्री. शंभुराज देसाई आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी शासकीय कार्यालयात जावे लागते. त्यामुळे अनेकजण योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. या योजना सुलभपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासठी 'शासन आपल्या दारी' अभियानाला सुरुवात करण्यात आली आहे. मोठ्या प्रमाणात नागरिकांना याचा लाभ देण्यात येत आहे.

महावितरणतर्फे लावण्यात आलेल्या स्टॉलच्या माध्यमातून आज दिवसभरात ३५० सिंगलफेज वीजजोडण्या मंजूर करुन ग्राहकांना प्रातिनिधीक स्वरुपात मीटरचे वाटप करण्यात आले. त्यासोबतच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, नावात बदल करणे, पत्त्यात बदल करणे, गो ग्रीन, छतावरील सौर प्रकल्प यांसारख्या योजनांची माहिती देण्यात आली. ग्राहकांनी महावितरण स्टॉलला उस्फूर्तपणे प्रतिसाद दिला. याप्रसंगी बारामती परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सुनील पावडे, अधीक्षक अभियंता श्री. गौतम गायकवाड, कार्यकारी अभियंता श्री. रविंद्र बुंदेले यांनी ग्राहकांना मार्गदर्शन केले.

◆◆◆

महावितरण विद्युत वार्ता
महावितरण ९

# महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे उत्साहात आयोजन

## नाशिक परिमंडल



## अमरावती परिमंडल



## अकोला परिमंडल



## लातूर परिमंडल



## पुणे परिमंडल




## कल्याण परिमंडल




## नागपूर परिमंडल



## चंद्रपूर परिमंडल



## नांदेड परिमंडल



## औरंगाबाद परिमंडल



## जळगाव परिमंडल



## बारामती परिमंडल



# प्रशिक्षणार्थी म्हणून ग्राहकसेवेचे कौशल्य आत्मसात करा- मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार



पुणे परिमंडलामध्ये अप्रेंटिस म्हणून नुकतीच २४ जणांची निवड करण्यात आली. त्यांच्यासोबत मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांनी संवाद साधला व मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणार्थी म्हणून काम करताना वीज वितरण यंत्रणेच्या तांत्रिक कामांसह उत्कृष्ट ग्राहकसेवा देण्याचे कौशल्य आत्मसात करा. कौशल्यावर आधारित क्षेत्रात काम करताना हे प्रशिक्षण अतिशय उपयुक्त ठरेल असे मत पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांनी व्यक्त केले.

पुणे परिमंडलामध्ये अप्रेंटिस म्हणून नुकतीच २४ जणांची एक वर्षासाठी प्रशिक्षणार्थी निवड करण्यात आली. विद्युत अभियांत्रिकीची पदवी व पदविका उत्तीर्ण असलेल्या या प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

मुख्य अभियंता श्री. पवार म्हणाले की, तांत्रिक क्षेत्रात प्रावीण्य मिळविण्यासाठी व्यावहारिक ज्ञान अतिशय महत्वाचे आहे. वीजक्षेत्रामध्ये ग्राहकसेवा देणाऱ्या महावितरण सारख्या सार्वजनिक कंपनीमध्ये वर्षभर प्रशिक्षण मिळणार आहे. प्रत्येकाचे तांत्रिक कौशल्य विकसित करण्याचा प्रशिक्षणातून प्रयत्न करण्यात येतील. तसेच अप्रेंटिस म्हणून भरती प्रक्रियेत प्राधान्य देखील मिळणार आहे. त्यामुळे वर्षभराच्या या प्रशिक्षणातून तांत्रिक कामाचे आणि तत्पर ग्राहकसेवेचे कौशल्य आत्मसात करा असे आवाहन पवार यांनी केले. यावेळी सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. ज्ञानदा निलेकर, कार्यकारी अभियंता श्री. बाळासाहेब हळनोर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. शिरीष काटकर, लघु प्रशिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष पटनी यांची उपस्थिती होती.

राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत ज्या उमेदवारांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे अशा उमेदवारांना अप्रेंटिस म्हणून निवडीसाठी प्रक्रिया सुरु करण्यात आली. यामध्ये विद्युत अभियांत्रिकी पदवी व पदविका उत्तीर्ण असलेल्या २४ जणांची निवड करण्यात आली असून वर्षभरासाठी हे प्रशिक्षणार्थी रुजू झाले आहेत. त्यांना सर्व प्रकारचे तांत्रिक प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

# राज्यभरातील २५ प्रशिक्षण केंद्रांमध्ये ‘पुणे’ अव्वल

नागरिक, विद्यार्थी, विविध एजन्सीचे कर्मचारी यांच्यासह महावितरणचे अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, कार्यशाळा, प्रबोधन व जनजागृतीसाठी महावितरणच्या मुख्य प्रशिक्षण केंद्राने राज्यातील २५ लघु प्रशिक्षण केंद्रांचे सन २०२२-२३ मधील मानांकन नुकतेच जाहीर केले आहे. यात पुणे परिमंडलाच्या लघु प्रशिक्षण केंद्राने प्रथम क्रमांकाचे स्थान पटकावले आहे.

पुणे परिमंडलाच्या गणेशखिंड येथील लघु प्रशिक्षण केंद्राने गेल्या आर्थिक वर्षामध्ये एकूण ८८ प्रशिक्षण वर्गांच्या माध्यमातून वर्ग एक ते चारमधील ४ हजार ९३० अभियंता, अधिकारी, नियमित व बाह्यस्त्रोत कर्मचारी तसेच १८ हजार ३२० वीजग्राहक, शालेय व अभियांत्रिकी विद्यार्थी, अप्रेंटीस, सौर ऊर्जा प्रकल्प, विद्युत वाहने चार्जिंग स्टेशन्स, मीटर रीडिंग एजन्सीचे कर्मचारी अशा एकूण २३ हजार २५० जणांना विविध विषयांवर प्रशिक्षण दिले आहे.

मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार व लघु प्रशिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष पटनी यांच्या पुढाकाराने पुणे परिमंडलामध्ये विविध विषयांवरील प्रशिक्षणाला मोठा वेग देण्यात आला आहे. त्याची फलनिष्पत्ती म्हणून नाशिक येथील मुख्य प्रशिक्षण केंद्राने दिलेले लक्ष्य पुणे परिमंडलाने तब्बल १९७ टक्क्यांनी पूर्ण करीत राज्यात अव्वल स्थान मिळविले आहे. यासाठी मुख्य महाव्यवस्थापक श्री. देवेंद्र सायनेकर (नाशिक), अधीक्षक अभियंता श्री. प्रकाश राऊत व श्री. सतीश राजदीप यांचेही सहकार्य मिळाले.

महावितरण अंतर्गत अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांना विद्युत सुरक्षा, उपकेंद्र व वितरण यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती, ॲडव्हान्स मीटरींग इन्फ्रास्ट्रक्चर, सौर ऊर्जा, विद्युत वाहने, वीजचोरी रोखण्याच्या उपाययोजना, प्रथमोपचार, ताणतणाव व्यवस्थापन, अचूक बिलींगसाठी उपाययोजना आदी विषयांवर तसेच घरगुती व सार्वजनिक विद्युत सुरक्षा, महावितरणची डिजिटल ग्राहकसेवा, वीजबचत आदींबाबत शहरी व ग्रामीण भागात मेळावे, पथनाट्य, शाळा व महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षण व प्रबोधन वर्ग आदींद्वारे नागरिकांना व विद्यार्थ्यांना प्रबोधन करण्यात येत आहे. तर सौर ऊर्जा निर्मित प्रकल्प, विद्युत वाहने चार्जिंग स्टेशन्स, मीटर रीडिंगच्या एजन्सीजच्या कर्मचाऱ्यांना नियमित प्रशिक्षण देण्यात येत आहे.

# अलिबाग येथे सोलर रूफ टॉप योजनेबाबत जनजागृती परिसंवाद

सोलर रूफ टॉप योजनेची जनजागृती करण्यासाठी भांडुप परिमंडलातील विविध ठिकाणी कार्यक्रम घेण्यात आले आहेत. भांडुप परिमंडलातील मुख्य अभियंता श्री. सुनील काकडे यांच्या आदेशानुसार व अधीक्षक अभियंता श्री. इब्राहीम मुलानी यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग येथील ओझोन रेसिडेन्सी कॉप. हाऊ. सोसायटीच्या रहिवाशांसाठी सोलर रूफ टॉप योजना जनजागृती कार्यक्रम नुकतेच घेण्यात आले.

जनजागृती कार्यक्रमात श्री. इब्राहिम मुलानी यांनी सोलार रुफ टॉप योजनेबाबत माहिती दिली व या योजनेचे फायदे सर्वांना समजावून सांगितले. घरगुती ग्राहकांना मिळत असलेल्या अनुदानाबाबत माहिती दिली. तसेच ऑनलाईन अर्ज करण्यासाठी व नेट मिटरिंग बद्दलही सांगितले. सोसायटीतील ग्राहकांनी योजनेबद्दल प्रश्न विचारून आपल्या शंकाचे निरसन केले. या कार्यक्रमात ५० कुटुंब सहभागी झाले.

या कार्यक्रमाला यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी अलिबागचे कार्यकारी अभियंता श्री. अजितकुमार पिंगळे, अलिबागचे सहाय्यक अभियंता श्री. विशाल सूर्यवंशी, सहाय्यक अभियंते सर्वश्री पंकज जाधव व प्रवीण म्हात्रे यांनी विशेष मेहनत घेतली.

## ग्राहकांकडून वीजसेवेचे कौतुक ही कामाची पावती संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे




कोल्हापूर येथील आयोजित 'ऊर्जावन भरारी' या कार्यक्रमात कर्मचाऱ्यांचा सत्कार करतांना संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे, सोबत मुख्य अभियंता श्री. परेश भागवत व इतर मान्यवर

महावितरणकडून महापूर, कोविडच्या आपातकालीन प्रसंगासह इतर वेळीही दैनंदिन सुरळीत वीजसेवा दिली जाते, ही बाब कोल्हापूर दौऱ्यावर असताना ग्राहकांनी प्रत्यक्ष भेटून उत्स्फुर्तपणे सांगितली. याचा मला आनंद व अभिमान वाटला. ग्राहकांकडून वीजसेवेचे कौतुक ही वीज कर्मचाऱ्यांच्या कामाची पावती असल्याचे प्रतिपादन संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे यांनी केले. महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिनी कोल्हापूर परिमंडलात आयोजित 'ऊर्जावन भरारी' गुणवंत कामगार सत्कार सोहळा व कौटुंबिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात ते बोलत होते.

याप्रसंगी बोलताना रेशमे म्हणाले की, यंदाच्या वर्षात कर्मचाऱ्यांनी भरीव कामगिरी केली आहे. त्यात सातत्य राखावे. ग्राहकांना उत्तम सेवा देणे व त्या सेवेचे मोल वेळेत वसूल करणे हे काम प्रत्येकाने जबाबदारीने पार पाडले तर महावितरणचा डोलारा व्यवस्थितपणे सांभाळता येणार आहे. ग्राहकांना दैनंदिन वीजसेवा पुरविण्यासाठी वीज खरेदी करावी लागते. त्यासाठी वीज बिल वसुली हा महसुलाचा एकमात्र स्त्रोत आहे, ही बाब ग्राहकांना वेळोवेळी सांगणे आवश्यक आहे. शेतीला दिवसा वीजपुरवठ्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी ही महत्वाकांक्षी योजना राबविली जाते आहे. त्यासाठी उपकेंद्राच्या परिसरात २ ते ५ मेगावॅटचे सौर प्रकल्प उभारण्यात येणार असल्याचे रेशमे यांनी स्पष्ट केले.

याप्रसंगी मुख्य अभियंता परेश भागवत, अधीक्षक अभियंता श्री. धर्मराज पेठकर, श्री. अंकुर कावळे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. शशिकांत पाटील, सहाय्यक महाव्यवस्थापक श्रीमती स्नेहा पार्टे-सोळांकूरकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भुपेंद्र वाघमारे, कार्यकारी अभियंते सर्वश्री अभिजीत सिकनीस, सुनिल शिंदे, सुनिल माने, सुधाकर जाधव, प्रशांत राठी, अप्पासो खांडेकर, संतोष कारंडे, पराग बापट, वरिष्ठ व्यवस्थापक श्रीमती सुमन पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रसाद रेशमे यांच्या हस्ते कोल्हापूर व सांगलीतील तंत्रज्ञ व यंत्रचालक संवर्गातील कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट कर्मचारी पुरस्काराने गौरविण्यात आले. रोलबॉल विश्वकरंडक स्पर्धेत कांस्यपदक प्राप्त भारतीय महिला संघाच्या सहाय्यक प्रशिक्षक 'वुमन ऑन व्हील्स' अपर्णा महाडीक यांचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरीबद्दल सन्मान करण्यात आला. अपर्णा महाडिक महावितरणात सहाय्यक लेखापाल पदावर कार्यरत आहेत.

◆◆◆

## 'वुमन ऑन व्हील्स' अपर्णा महाडीक यांचा सन्मान



रोलर हॉकीच्या आंतरराष्ट्रीय खेळाडू व रोलबॉलच्या राष्ट्रीय प्रशिक्षक अपर्णा महाडीक यांचा सत्कार करतांना कोल्हापूर परिमंडळाचे मुख्य अभियंता परेश भागवत, सोबत इतर मान्यवर

श्री. शिवछत्रपती स्टेडियम, म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे येथे नुकतीच पार पडलेल्या रोलबॉल विश्वकरंडक स्पर्धेत भारतीय महिला संघाने कांस्यपदक प्राप्त केले. या संघाच्या सहाय्यक प्रशिक्षक पदाची जबाबदारी 'वुमन ऑन व्हील्स' अपर्णा महाडीक यांनी भूषविली.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील या कामगिरीबद्दल कोल्हापूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. परेश भागवत यांच्या हस्ते अपर्णा महाडीक यांचा सन्मान करण्यात आला. भविष्यातही आपल्याकडून देशाचा बहुमान वाढविणारी कामगिरी व्हावी. रोलबॉलचे अनेक उत्कृष्ट खेळाडू घडवावेत, अशी अपेक्षा भागवत यांनी व्यक्त केली.

सहाय्यक लेखापाल या पदावर कार्यरत असलेल्या अपर्णा महाडीक या रोलर हॉकीच्या आंतरराष्ट्रीय खेळाडू व रोलबॉलच्या राष्ट्रीय प्रशिक्षक आहेत. यंदा प्रारंभी भारतीय महिला संघाच्या व्यवस्थापक तर सहाय्यक प्रशिक्षक पदाची जबाबदारी 'वुमन ऑन व्हील्स' अपर्णा महाडीक यांच्या खांद्यावर आली. ती यशस्वीपणे सांभाळून स्पर्धेत भारतीय संघाची कामगिरी त्यांनी उंचाविली.

या कामगिरीबद्दल अपर्णा महाडीक यांचे अधीक्षक अभियंता श्री. अंकुर कावळे व अधीक्षक अभियंता श्री. मनोज विश्वासे, सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. शशिकांत पाटील, अपर्णा खरोटे, स्नेहा पार्टे- सोळांकूरकर, कार्यकारी अभियंते श्री. अभिजित सिकनीस, प्रशांत मासाळ, सुनिल शिंदे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भुपेंद्र वाघमारे, वरिष्ठ व्यवस्थापक श्रीमती सुमन पाटील यांनी कौतुक केले आहे.

◆◆◆

## बहुउद्देशीय प्रशिक्षण केंद्राचे पुण्यात उद्घाटन




रास्तापेठ येथील महावितरणच्या भारतरत्न सर मोक्षगुंडम् विश्वेश्वरय्या बहुउद्देशीय प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांच्याहस्ते झाले.

अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी पुणे परिमंडलाच्या रास्तापेठ येथील प्रशासकीय इमारतीमध्ये भारतरत्न सर मोक्षगुंडम् विश्वेश्वरय्या बहुउद्देशीय प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांच्याहस्ते नुकतेच झाले.

या कार्यक्रमाला अधीक्षक अभियंता श्री. प्रकाश राऊत व सतीश राजदीप, सहायक महाव्यवस्थापक माधुरी राऊत (वित्त व लेखा) व ज्ञानदा निलेकर (मानव संसाधन) तसेच सर्व कार्यकारी अभियंता, अधिकारी आणि लघुप्रशिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष पटनी यांची उपस्थिती होती.

पुणे परिमंडलातील अभियंता, अधिकारी, कर्मचारी तसेच महावितरणशी संबंधित एजन्सीच्या कर्मचाऱ्यांना, प्रतिनिधींना विविध प्रकारचे नियमित प्रशिक्षण देण्यात येते. पुणे परिमंडलाच्या रास्तापेठ येथील पूर्वीच्या मध्यवर्ती ग्राहकसेवा केंद्राच्या जागेमध्ये ८० जणांची आसन व्यवस्था तसेच प्रोजेक्टर, ध्वनी व्यवस्था उभारून हे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले आहे. या प्रशिक्षण केंद्रामध्ये विविध प्रशिक्षणाचे वर्ग आयोजित करण्यात येणार आहे.

◆◆◆

## प्रकाशगड मुख्यालयात महाराष्ट्र दिन साजरा


महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अन्बलगम ध्वजारोहन करतांना

महावितरण व महानिर्मिती या कंपन्यांचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगड येथे महाराष्ट्र दिन साजरा साजरा करण्यात आला. महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी. अनबलगम यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी महानिर्मितीचे संचालक (संचालन) संजय मारुळकर, संचालक (प्रकल्प) अभय हरणे, मुख्य अभियंता राकेश जनबंधू, मुख्य औद्योगिक संबध अधिकारी श्री संजय ढोके यांच्यासह महावितरण व महानिर्मिती या कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

◆◆◆

## मानव संसाधन संचालकपदी
## श्री. अरविंद भादीकर



महावितरणचे संचालक (मानव संसाधन) म्हणून अरविंद भादीकर यांची सरळसेवा भरतीद्वारे निवड झाली आहे. त्यांनी नुकताच आपला पदभार स्वीकारला आहे. यापूर्वी अरविंद भादीकर हे कार्यकारी संचालक वितरण आणि मानव संसाधन (प्रभारी) म्हणून कार्यरत होते व त्यांनी या दोन्ही पदांचा कार्यभार यशस्वीपणे सांभाळला आहे.

अमरावती येथील मूळचे रहिवासी असलेले अरविंद भादीकर हे अमरावती शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून बी. ई. झाले आहेत. मार्च-१९९२ साली तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात जळगाव जिल्ह्यातील भडगाव येथे कनिष्ठ अभियंता म्हणून ते रुजू झाले.

खडका येथील ४०० किव्हो उपकेंद्रात सहाय्यक अभियंता व उपकार्यकारी अभियंता म्हणूनही त्यांनी काम केले. २००५ मध्ये वाशीम विभागाचे कार्यकारी अभियंता तसेच मुख्यालयातील पायाभूत आराखडा, नागपूर ग्रामीण मंडल व अमरावती मंडल येथे अधीक्षक अभियंता आणि अकोला व चंद्रपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून ते कार्यरत होते.

◆◆◆

## संचालक (वाणिज्य) पदी
## श्री. योगेश गडकरी



महावितरणचे संचालक (वाणिज्य) म्हणून योगेश गडकरी यांची सरळसेवा भरतीद्वारे निवड झाली आहे. नुकताच त्यांनी संचालक (वाणिज्य) या पदाचा पदभार स्वीकारला आहे. यापूर्वी योगेश गडकरी हे कार्यकारी संचालक (देयके व महसूल) म्हणून कार्यरत होते.

नागपूर येथील मूळचे रहिवासी असलेले योगेश गडकरी यांनी अमरावती येथून अभियांत्रिकी महाविद्यालयातून बी.ई. (कम्प्युटर इंजिनिअरिंग) केले आहे. एप्रिल १९९४ मध्ये तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात कनिष्ठ अभियंता म्हणून वर्धा येथे रुजू झाले. त्यांनी मुंबई मुख्यालयात विविध पदावर काम केले आहे. त्यांची पदोन्नतीद्वारे कार्यकारी संचालक (देयके व महसूल) या पदावर नियुक्ती करण्यात आली होती.

त्यांचा वीज क्षेत्रातील अतिशय अभ्यासू अधिकारी म्हणून लौकीक आहे. तसेच त्यांनी महावितरणच्या केंद्रीय बिलींग प्रणालीमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणले असून त्यामुळे ग्राहकांच्या तक्रारी कमी झाल्या असून महावितरणच्या महसुलात वाढ झाली आहेत.

◆◆◆

## मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे अधिवेशन म्हणजे प्रबोधनात्मक मेळावे : श्री. दिनेश वाघमारे



अधिवेशन उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवर

तब्बल वीस वर्षांनी कोल्हापुरात हे अधिवेशन पुन्हा होत आहे. महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे अधिवेशन म्हणजे प्रबोधनात्मक मेळावे असतात. या अधिवेशनाच्या माध्यमातून अधिकारी, अभियंते, कर्मचारी यांना दिशा मिळते, ऊर्जा मिळते, असे प्रतिपादन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी केले.महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या २२व्या राज्यव्यापी द्विवार्षिक अधिवेशन कोल्हापूर येथे संपन्न झाले. या अधिवेशनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

संघटनेच्या माध्यमातून शिक्षणाबाबत ग्रामीण भागामध्ये समाज प्रबोधन करून शासनाच्या विविध व शैक्षणिक योजना उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. जनजागृती केली पाहिजे. तरच आपण आपला दर्जा उंचावू शकू, असे श्री. दिनेश वाघमारे यांनी स्पष्ट केले. तर पदोन्नतीसाठी कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यात मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे मोठे योगदान आहे. सरळ सेवा व पदोन्नतीसाठी संघर्ष आणि न्यायालयीन लढा संघटनेने केला, असे प्रतिपादन संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. संजय घोडके यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केले.

माणगाव परिषदेत २०२० साली शंभर वर्ष पूर्ण होत आहेत. याचा ऐतिहासिक संदर्भ घेऊन तसेच २०२२ हे वर्ष राजर्षी शाहू महाराजांचे कृतज्ञता पर्व म्हणून साजरे केले गेले. हा दुहेरी संयोग घेऊन हे अधिवेशन कोल्हापुरात घेण्यात आले आहे, असे प्रतिपादन संघटनेचे सरचिटणीस श्री. प्रेमानंद मौर्य यांनी केले.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी नॅशनल लॉ अकॅडमीचे माजी संचालक व अधिवक्ता डॉ.जी.मोहन गोपाल यांचे शासकीय सेवेतील प्रतिनिधित्वाची संविधानिक संकल्पना, सद्यस्थिती व पुढील आव्हाने, सामाजिक विचारवंत डॉ. लक्ष्मण यादव यांचे फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित कामगार चळवळीची आवश्यकता, चॅनेल १९ इंडियाचे संचालक श्री. नवीन कुमार यांचे आंबेडकरी चळवळ मजबूत करण्यासाठी माध्यमे व सामाजिक माध्यमांची उपयुक्तता, प्रसिद्ध विचारवंत डॉ. सुभाष देसाई यांचे मानव मुक्तीच्या लढ्यामध्ये माणगाव परिषदेचे महत्त्व आणि समानतेच्या तत्त्वाची वास्तविकता, सामाजिक विचारवंत डॉ. विनोद पवार यांचे भारतीय संविधानासमोरील आव्हाने, आर्थिक बदलांचे अभ्यासक श्री.गौरव सोमवंशी यांचे बदलत्या आर्थिक व्यवस्थेमध्ये सामाजिक न्यायाचा लढा आदी विविध विषयांवर विचारवंतांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास स्वतंत्र मजदूर युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. एस.पाटील, राष्ट्रीय महासचिव श्री.ए.व्ही.किरण, समन्वयक श्री.के.पी. स्वामीनाथन, राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री.एन.बी. जारोंडे, कार्याध्यक्ष श्री.एस.के. हनवते, मुख्य संघटक श्री.वाय.के.कांबळे, उपसरचिटणीस श्री. दिनेशकुमार कांबळे, कार्यकारी संचालक श्री.रोहिदास म्हस्के, श्रीमती शिल्पा कुंभार, महावितरणचे मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री.अनिल कांबळे यांच्यासह महाराष्ट्रातून सुमारे ५००० अधिकारी, अभियंते व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन केंद्रीय उपाध्यक्ष श्री. आर. एस. कांबळे यांनी केले. तर आभार केंद्रीय महिला प्रतिनिधी श्रीमती निशा चौधरी यांनी मानले.

◆◆◆

# लातूर विभागात सेवापुस्तिका पडताळणी कार्यक्रम



सेवापुस्तिका पडताळणी कार्यक्रमात सहभागी कर्मचारी.

लातूर विभागात नुकताच कर्मचाऱ्यांकडून गट विमा नामनिर्देशन आणि सेवापुस्तिका पडताळणी कार्यक्रम राबविण्यात आला. लातूर विभागीय कार्यालयाचे कार्यकारी अभियंता श्री. गणेश सामसे यांच्या सुचनेनुसार उपव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. उत्तम रायपल्ले आणि त्यांच्या मानव संसाधन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सेवापुस्तिका कार्यक्रम विभाग, उपविभाग आणि शाखा कार्यालय स्तरावर मेळावे घेवून यशस्वीरितीने राबविला. यात सुमारे साडे चारशे ते पाचशे कर्मचाऱ्यांना त्यांची सेवापुस्तिका स्वत:ला पडताळता आली.

कर्मचाऱ्यांच्या नावातील अचूकता, त्यांचे पदनाम, भविष्य निर्वाह निधी क्रमांक, वारसांच्या नोंदी, रुजू दिनांक, पदोन्नती, वैद्यकीय चाचणी, मराठी भाषा सुट बाबतच्या नोंदीसह वार्षिक वेतन वाढी, उच्चवेतन वाढी, उपदान नामनिर्देशन, रजा, जात प्रमाणपत्रांच्या नोंदी आदी विषयांच्या नोंदी अचूकरित्या सेवापुस्तिकेत आहेत की नाहीत याची पडताळणी प्रत्येक कर्मचाऱ्याला या कार्यक्रमातून करण्यात आली. काही कर्मचाऱ्यांना झालेल्या चूका दुरुस्त करण्याचीही संधी या माध्यमातून उपलब्ध झाली.

सेवापुस्तिका पडताळणी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वश्री दत्तात्रय काळे, शेषेंद्र स्वामी,सुषमा खिचडेव, धनश्री शिंदे यांनी परिश्रम घेतले.

◆◆◆

# जयसिंगपूर विभागीय कार्यालयात हिरकणी कक्ष सुरु



हिरकणी कक्षाच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित अधिकारी व कर्मचारी.

कोल्हापूर परिमंडलातील जयसिंगपूर विभागीय कार्यालयात जागतिक महिला दिनाच्या औचित्याने महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी हिरकणी कक्ष सुरू करण्यात आला आहे. या कक्षाचे उद्घाटन उच्चस्तर लिपिक श्रीमती दिपाली कुलकर्णी यांचे हस्ते करण्यात आले. अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्रीमती मीनाक्षी अवघडे यांनी कक्षाची कल्पना मांडली. कार्यकारी अभियंता श्री. वैभव गोंदिल यांनी अभिनव उपक्रमास सहमती दर्शविली. महिला कर्मचारी वर्गाने उपलब्ध जागेच्या व साधन सामग्रीचा उपयोग करून हिरकणी कक्षाची निर्मिती केली. हा महिलांसाठी विश्रांती कक्षही असणार आहे. त्यामुळे महिला कर्मचारी सुखावल्या. या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

◆◆◆

# महापुरात विद्युत वाहिनी जलमग्न होण्याचा धोका टळला



शिरदवाडला पंचगंगा काठावर उभारण्यात आलेली 'टॉवर-गुढी'

पंचगंगानदी ओलांडून ३३/११ केव्ही शिरदवाड उपकेंद्रास जोडणाऱ्या उच्चदाब विद्युत वाहिनीची उंची वाढविण्यासाठी महावितरणने 'टॉवर-गुढी' उभारली आहे. पंचगंगेच्या काठावर २१ मीटर उंचीचे दोन टॉवर उभारल्याने महापुरात उच्चदाब विद्युतवाहिनी जलमग्न होण्याचा धोका टळला आहे. त्यामुळे शिरदवाड व परिसरातील आठ हजार ग्राहकांसाठीही अखंडित प्रकाशाची 'टॉवर-गुढी' ठरली आहे.

महापुराच्या आपात्कालीन प्रसंगी जनजीवन सुरळीत रहावे, या हेतूने प्रतिबंधात्मक उपाय योजनांमध्ये जिल्हा प्रशासनाच्या पुढाकारातून नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. त्या दृष्टीने पायाभूत सुविधांचे बळकटीकरणात अखंडित वीज सेवेकरीता शिरदवाड येथील 'टॉवर-गुढी' हा एक पायलट प्रकल्प आहे. जिल्हाधिकारी श्री.राहूल रेखावार यांच्या कल्पकतेतून तो साकारला आहे. याकरिता आमदार श्री. प्रकाश आवाडे यांनी पाठपुरावा केला. जिल्हा नियोजन व विकास समितीच्या निधीतून पंचगंगा काठावर २१ मीटर उंचीचे दोन टॉवर व आठ उच्चदाब वाहिनीचे वीज खांब उभारण्यात आले आहे. आता टॉवरमुळे नदीपात्र ओलांडताना विद्युत वाहिनीची पात्रा पासूनची उंची पूर्वीच्या तुलनेत ६ ते ७ मीटरने वाढली आहे. टॉवर उभारणीकरिता सर्वश्री बाबासाहेब काळे, कुमार तारदाळे (इचलकरंजी) आणि चंद्रकांत काळे, रमेश काळे व श्रीकांत गतारे (शिरदवाड) यांनी मोलाचे सहकार्य केले.

सन २०१९ मधील महापुरावेळी महापारेषणच्या ११० के. व्ही. इचलकरंजी उपकेंद्रातून ३३/११ केव्ही शिरदवाड उपकेंद्रास वीजपुरवठा करणारी उच्चदाब विद्युत वाहिनी पुराच्या पाण्यात बुडाली होती. त्यामुळे जवळपास ८ हजार वीज ग्राहकांचा वीजपुरवठा ४ दिवस बाधित झाला होता. या टॉवर उभारणीमुळे आता पूर्वस्थिती उद्भवण्याचा धोका टळला आहे.

याकरिता अधीक्षक अभियंता श्री. अंकुर कावळे यांच्या मार्गदर्शनाखाली इचलंकरजी विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. प्रशांत कुमार राठी, उपविभागीय अभियंता श्री. सुनिल अकिवाटे, सहाय्यक अभियंता श्री. शिवराज पाटील यांनी कामकाज पाहिले. या नाविन्यपुर्ण उपाययोजनेच्या कामाबद्दल मुख्य अभियंता श्री. परेश भागवत यांनी इचलकरंजी विभागातील अधिकारी - कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

◆◆◆

# प्रशासकीय वृत्त

## मुख्य अभियंता, बदली

| नाव | बदलीपुर्वीचे ठिकाण | बदली नंतरचे ठिकाण |
|---|---|---|
| डॉ. मुरहरी सोपानराव केळे | सांघिक कार्यालय, मुंबई | औरंगाबाद परिमंडल |

## अधीक्षक अभियंता, पदोन्नती



महेश तिनपा अंचिनमने
पायाभुत सुविधा, कल्याण परिमंडल



अनिल वासुदेव महाजन
जळगाव मंडल



युवराज जगन्नाथ जरग
पुणे ग्रामिण मंडल



निरज गजानन वैरागडे
धुळे मंडल



प्रकाश सोनेराव खांडेकर
अहमदनगर मंडल



अनिल तानबाजी काळे
पायाभुत सुविधा, लातूर परिमंडल



युवराज दिनकरराव मेश्राम
ठाणे मंडल



रामराव धनसिंह राठोड
गोंदीया मंडल



मधुकर दत्तात्रय घुगे
बीड मंडल



सुनिल लक्ष्मण शिंदे
अमरावती मंडल



जगदीश तोताराम इंगळे
मालेगाव मंडल



मनोज बाबुराव धाबर्डे
वितरण विभाग (नियोजन कक्ष)
सांघिक कार्यालय, मुंबई

## अधीक्षक अभियंता, बदली

| नाव | बदलीपुर्वीचे ठिकाण | बदली नंतरचे ठिकाण |
|---|---|---|
| १. राजाराम बाबू माने | वाशी मंडल | परभणी मंडल |
| २. सुरेश मारोतीराव मडावी | यवतमाल मंडल | गडचिरोली मंडल |
| ३. राजेशसिंह माधोसिंह चव्हाण | वसई मंडल | हिंगोली मंडल |
| ४. दिलीप विठ्ठलराव खानंदे | अमरावती मंडल | पालघर मंडल |
| ५. संजय सुदामराव खंडारे | नाशिक परिमंडल | वसई मंडल |
| ६. अरविंद विठ्ठलराव बुलबुले | ठाणे मंडल | रास्तापेठ मंडल |
| ७. प्रकाश शामराव राऊत | रास्तापेठ मंडल | यवतमाळ मंडल |
| ८. मनोज कल्याण विश्वासे | कोल्हापूर परिमंडल | पायाभुत सुविधा, जळगाव परिमंडल |
| ९. रमेश शंकरराव सानप | मालेगाव मंडल | पायाभुत सुविधा, नांदेड परिमंडल |
| १०. मंदार अनंत अत्रे | सांघिक कार्यालय, मुंबई | पायाभुत सुविधा, भांडूप परिमंडल |
| ११. शुभांगी सिद्धराम कटकधोंड | पायाभुत सुविधा, भांडूप परिमंडल | औरंगाबाद प्रादेशिक कार्यालय (चाचणी) |

# 'सीओईपी'कडून मुख्य अभियंता श्री.राजेंद्र पवार यांचा सत्कार



**मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांचा गौरव करताना कुलगुरू प्रा. डॉ. मुकुल सुतावणे.**

सीओईपी टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्यावतीने कुलगुरू प्रा. डॉ. मुकुल सुतावणे यांच्याहस्ते या विद्यापीठाचे माजी विद्यार्थी व महावितरणच्या पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांचा विद्यापीठाच्या सभागृहात नुकताच सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर अधीक्षक अभियंता प्रकाश राऊत व सतीश राजदीप यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांनी तत्कालिन कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे या शासकीय महाविद्यालयातून १९८८ मध्ये विद्युत अभियांत्रिकी पदवी विशेष प्राविण्यासह प्राप्त केली. त्यानंतर श्री. पवार महावितरणच्या सेवेत दाखल झाले. श्री. राजेंद्र पवार यांची नुकतीच मुख्य अभियंतापदी पदोन्नती झाली. त्यानिमित्त सीओईपी टेक्नॉलॉजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. मुकुल सुतावणे यांच्याहस्ते श्री. पवार यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी कुलगुरू प्रा. सुतावणे म्हणाले की, सामाजिक बांधिलकी जपणारे श्री. पवार यांचा शैक्षणिक प्रवास हा उत्कृष्ट राहिला आहे. तसेच वीज व सेवा क्षेत्रातील ३३ वर्षांच्या अनुभवामुळे श्री. पवार यांच्या नेतृत्वात पुणे परिमंडलातील महावितरणच्या विविध सेवा अधिकाधिक ग्राहकाभिमुख होतील व ग्राहकांना उत्कृष्ट सेवा मिळेल. सोबतच सीओईपी विद्यापीठ व महावितरणच्या संयुक्त सहकार्याने वीज क्षेत्रातील विविध आधुनिक अभ्यासक्रमांना चालना दिली जाईल, असे कुलगुरू प्रा. सुतावणे यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संतोष पटनी यांनी केले.

◆◆◆

# रोलबॉल विश्व चषक संघाच्या व्यवस्थापक पदी श्रीमती अपर्णा महाडीक



श्रीमती अपर्णा महाडीक यांचा सत्कार करताना मुख्य अभियंता श्री. परेश भागवत, सोबत मान्यवर.

रोलबॉल फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने श्रीमती अपर्णा महाडीक यांची रोलबॉल विश्वचषकासाठी भारतीय महिलासंघाच्या संघ व्यवस्थापक पदावर निवड झाली आहे. त्या कोल्हापूर कार्यालयात सहाय्यक लेखापाल पदावर कार्यरत आहेत. महाडीक या रोलबॉल खेळाच्या राष्ट्रीय प्रशिक्षक तर रोलर हॉकी या खेळाच्या त्या आंतरराष्ट्रीय खेळाडू आहेत.

रोलबॉलच्या सहाव्या विश्वचषक स्पर्धेचे आयोजन श्री. शिवछत्रपती स्पोर्टस कॉम्प्लेक्स म्हाळुंगे, बालेवाडी, पुणे येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत गतविजेता केनिया (२०१८), ब्राझिल, नेदरलँड, डेन्मार्क, नेपाळ, बांग्लादेश, हाँगकाँग, स्वीडन, युनायटेड किंगडम असे २० हून अधिक देश सहभागी झाले होते. तत्पुर्वी त्या कोईम्बतूर (तामिळनाडू) व गुवाहाटी (आसाम) येथे संघ निवड पूर्व शिबीरास उपस्थित राहिल्या. या निवडीबद्दल त्यांच मुख्य अभियंता श्री. परेश भागवत, सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. शशिकांत पाटील, अधीक्षक अभियंता श्री. अंकुर कावळे, कार्यकारी अभियंता सर्व श्री. सुनिल शिंदे, अभिजीत सिकनीस, प्रशांत मासाळ, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भुपेंद्र वाघमारे यांनी कौतुक केले.

◆◆◆

# महावितरणचा
## ‘पॉवर लिफ्टर’ मनीष कोंडा


श्री. मनीष कोंड्रा

पुणे परिमंडलअंतर्गत वरिष्ठ यंत्रचालक म्हणून कार्यरत असणारे श्री. मनीष विनायक कोंड्रा यांनी ‘पॉवर लिफ्टिंग’ खेळ प्रकारात राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सुवर्ण पदकांसह अनेक पदकांची कमाई करून क्रीडा क्षेत्रात नावलौकीक मिळविला आहे. महावितरणमध्ये ‘स्ट्राँग मॅन’ म्हणून श्री. कोंड्रा यांची वेगळी ओळख आहे. त्यांचा ‘पॉवर लिफ्टिंग’ क्रीडा प्रकारातील ‘स्कॉट, बेंच व डेड’ प्रकारात सन २००१ पासून सुरु झालेला प्रवास त्यांच्या वयाच्या ४८ व्या वर्षी आजतागायत कायम आहे.

तत्कालिन विद्युत मंडळामध्ये १९९४ मध्ये कारागिर (क)/ मीटर वाचक पदी निवड होऊन श्री. मनीष कोंड्रा महावितरणच्या सेवेत शिरुर (जि. पुणे) येथे रुजू झाले. व्यायामाची आवड असल्याने नियमित व्यायाम व प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनात वजने उचलण्याची तालीम सुरु केली. दरम्यान श्री. कोंड्रा यांनी सन २००१ मध्ये सर्वप्रथम ‘पॉवर लिफ्टिंग स्पर्धेतील ‘स्कॉट, बेंच व डेड’ या तीनही प्रकारात सहभाग घेतला. येथून सुरु झालेला हा प्रवास आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये चमकदार ठरला आहे. त्यानंतर २००६ मध्ये जबलपूर येथील अखिल भारतीय विद्युत क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक मिळवित पहिल्याच राष्ट्रीय स्पर्धेत यश संपादन केले. त्यानंतर लगेचच मनीला येथे झालेल्या ८ व्या आशियाई बेंच प्रेस स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व करीत चौथा क्रमांक मिळविला. पुण्यातील मेगा कॉर्निवल स्पर्धेत सर्वाधिक वजन उचलण्यासाठी श्री. कोंड्रा यांना ‘बेस्ट लिफ्टर’चा सन्मान मिळाला. बंगलोर येथील २००८ च्या अखिल भारतीय विद्युत क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले. यासह विविध राज्य व राष्ट्रीय पातळीवर ‘पॉवर लिफ्टिंग’ क्रीडा स्पर्धेत अनेक पदकांची कमाई केली आहे. या कामगिरीची दखल घेऊन २००८ मध्ये जिल्हा क्रीडा पुरस्काराने श्री. मनीष कोंड्रा यांचा विधानसभेचे विरोधी पक्षनेते श्री. अजित पवार यांच्याहस्ते गौरव करण्यात आला.

यानंतर वयाची ३९ वर्ष पूर्ण केल्यानंतर श्री. मनीष कोंड्रा यांनी मास्टर वनच्या गटातील स्पर्धेत सहभाग सुरु केला. यामध्ये २०१५ मध्ये हाँगकाँग येथे झालेल्या आशियाई स्पर्धेत ‘स्कॉट, बेंच व डेड’ या तीनही प्रकारात तब्बल ५१० किलोग्रॅम वजन उचलले आणि स्पर्धेत एक सुवर्ण व तीन रौप्य पदकांची कमाई करीत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर श्री. मनीष कोंड्रा यांनी २०१७ च्या जम्मू येथील राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. तसेच २०२१ मध्ये औरंगाबाद येथे झालेल्या ‘बेस्ट लिफ्टर’चे प्रथम क्रमांक तर गोवा येथील बेंच प्रेस स्पर्धेत रौप्य पदकाचे मानकरी ठरले. सद्यस्थितीत ७४ वजनगटात मास्टर-टू स्पर्धेतील सहभागासाठी श्री. मनीष कोंड्रा यांची पूर्वतयारी सुरु आहे. क्रीडा क्षेत्रात श्री. मनीष कोंड्रा यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महावितरणकडून विविध प्रसंगी गौरव करण्यात आला आहे.

◆◆◆

# चि. सिद्धांत शृंगारेच्या
## ‘व्हॉट इफ स्पेस’ पुस्तकाचे प्रकाशन


पुस्तक प्रकाशन प्रसंगी माजी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, लेखक चि. सिद्धांत शृंगारे व इतर मान्यवर.

तेरा वर्षाच्या चि. सिद्धांत सुशांत शृंगारे या विद्यार्थ्याने इंग्रजीत लिहिलेल्या व खगोल शास्त्रावर आधारित ‘व्हॉट इफ स्पेस’ या पुस्तकाचे प्रकाशन माजी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात सिद्धांतच्या पुस्तक प्रकाशनाच्या निमित्ताने त्यांच्याकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सार्थ पद्धतीने अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. अविनाश दोडके होते. चि. सिद्धांतचे ‘व्हॉट इफ स्पेस’ हे विज्ञान कथेचे पुस्तक असून यात लेखकाच्या कल्पनेवर आधारित कथांचा समावेश आहे. तसेच यात पुनर्संचयित खगोलीय वस्तू, अस्तित्वात नसलेल्या वेळेचे परिणाम, कृष्णविवराची सूर्याची टक्कर यासारख्या मनोरंजकविषयांची माहिती देण्यात आली आहे.

चि. सिद्धांत शृंगारे यांचे वडील श्री. सुशांत शृंगारे महावितरणमध्ये यंत्रचालक म्हणून कार्यरत आहे. तर आई उच्च माध्यमिक शाळेत शिक्षिका आहेत. कार्यक्रमात अनेक मान्यवर उपस्थित होते. नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके यांनीही चि. सिद्धांत यांचे अभिनंदन केले आहे.

◆◆◆

# श्री. रमेश शिंदे यांना
## राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार


श्री. रमेश शिंदे

औरंगाबाद परिमंडलातील कर्मचारी श्री. रमेश काकासाहेब शिंदे यांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे साहित्य लेखन पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे १७ वे कामगार साहित्य संमेलन बालगंधर्व नाट्यमंदिर, मिरज (सांगली) येथे नुकतेच संपन्न झाले. कामगारांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने कामगारांसाठी राज्यस्तरीय साहित्य लेखन स्पर्धेचे आयोजन मंडळातर्फे करण्यात आले होते. या स्पर्धेत श्री. रमेश शिंदे यांना ‘राष्ट्र उत्थानासाठी कामगारांचा सहभाग’ या विषयावरील वैचारिक लेखन या साहित्य प्रकारात राज्यस्तरीय प्रथम ‘लोकहितवादी’ पुरस्कार मिळाला. तसेच ‘सलम या कवितेसाठी काव्य लेखन या साहित्य प्रकारात ‘पद्मश्री नारायण सुर्वे’ उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. या यशाबद्दल महावितरणच्या औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक(प्रभारी) श्री. सचिन तालेवार, सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी (प्रभारी) श्री. विश्वास पाटील यांनी श्री. शिंदेंचे अभिनंदन केले आहे.

श्री. शिंदे हे सध्या हिवरा ३३ केव्ही उपकेंद्रात यंत्रचालक म्हणून कार्यरत आहेत. ते मूळचे औरंगाबाद तालुक्यातील वाहेगाव देमनी येथील रहिवासी आहेत. महाविद्यालयीन स्तरावर आपल्या अभिनय कौशल्याने विविध युवक महोत्सव, राष्ट्रीय आंतरविद्यापीठ स्पर्धा गाजवणाऱ्या श्री. शिंदेंनी महावितरणसह कामगार नाट्य स्पर्धा व राज्य नाट्य स्पर्धांतही विविध पारितोषिके पटकावलेली आहेत. उत्कृष्ट निवेदक, सूत्रसंचालक असलेल्या शिंदेंचे ‘उद्योगाचा कणा : कामगार आणि वास्तव’ हे पुस्तक प्रकाशित झालेले असून ते कामगार चळवळीतही सक्रीय आहेत.

◆◆◆

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना महत्त्वाकांक्षी प्रकल्प मा. उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन



मुख्यमंत्री सौर ऊर्जा वाहिनी योजना – २.० याची माहिती देणाऱ्या पुस्तिकेचे प्रकाशन मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मा. मुख्य सचिव श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला व महावितरणचे स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक उपस्थित होते.

सौर ऊर्जा तयार करून शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठीचा मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून राज्य सरकारचा प्रमुख प्रकल्प म्हणून त्याच्या अंमलबजावणीवर सर्वांनी भर द्यावा, असे आवाहन मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना – २.० या अभियानाचा शुभारंभ मा. उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. सचिव, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या बैठकीत मुंबईत अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी राज्याचे मुख्य सचिव श्री.मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री.विजय सिंघल आणि महावितरणचे स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक यावेळी उपस्थित होते.

शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी सौर ऊर्जा वापरून ७००० मेगावॅट वीजनिर्मिती करणे आणि २०२५ पर्यंत ३० टक्के कृषी फिडर्स सौर ऊर्जेवर चालविणे असे 'मिशन २०२५' या अभियानाच्या माध्यमातून निश्चित करण्यात आले आहे.

मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सौर ऊर्जा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यास गुंतवणूकदार उत्सुक आहेत. या प्रकल्पांसाठी ज्या वेगाने जमिनी उपलब्ध होतील त्या वेगाने कृषी फीडर्स सौरऊर्जेवर चालविता येतील. शेतकऱ्यांनी प्रकल्पासाठी जमीन भाड्याने दिली तर त्यांना दरवर्षी हेक्टरी सव्वा लाख रुपये भाडे मिळेल. जमीन उपलब्ध करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा. आपला जिल्हा सर्वप्रथम शेतीसाठी शंभर टक्के सौर ऊर्जा वापरणारा होईल व जिल्ह्यात शेतीला दिवसाचे २४ तास वीज उपलब्ध होईल यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी उद्दीष्ट ठेवावे.

त्यांनी सांगितले की, सौर ऊर्जेद्वारे निर्माण केलेल्या विजेचा वापर केला तर शेतीसाठी कमी दरात वीज उपलब्ध होईल आणि उद्योगांसाठीच्या वीजदरात लागू केलेली क्रॉस सबसिडी कमी करता येईल. राज्यातील उद्योग क्षेत्राला त्यामुळे अधिक स्पर्धात्मक होता येईल.शेतीसाठी सौर ऊर्जेचा वापर करण्याप्रमाणे आगामी काळात ग्रामपंचायत क्षेत्रातील शाळा, दवाखाने, पिण्याचे पाणी, ग्रामपंचायत कार्यालये इत्यादी सौर ऊर्जेवर चालविण्याचाही विचार करावा, अशी सूचना त्यांनी केली.

प्रधान सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला यांनी ऊर्जा विभागाच्यावतीने मान्यवरांचे स्वागत केले. त्यांनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना – २.० ची धोरणात्मक संकल्पना स्पष्ट करणारे सादरीकरण केले. मा. अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री.विजय सिंघल यांनी योजनेबद्दल सादरीकरण केले.

◆◆◆

## श्री. लोकेश चंद्र यांनी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकपदाची सूत्रे स्वीकारली



महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून श्री. लोकेश चंद्र (भाप्रसे) यांनी नुकतीच पदाची सूत्रे स्वीकारली आहे. याआधी ते मुंबई 'बेस्ट' उपक्रमाचे महाव्यवस्थापक पदी कार्यरत होते.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र हे १९९३ च्या बॅचचे भारतीय प्रशासकीय सेवेचे अधिकारी आहेत. त्यांनी आयआयटी (दिल्ली) मधून स्थापत्य अभियांत्रिकीची पदवी आणि एमटेक (स्ट्रक्चर्स) पदवी प्राप्त केली आहे.

श्री. चंद्र यांनी यापूर्वी सिडकोचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून काम केले आहे. तसेच नागपूर, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी आणि नागपूर सुधार प्रन्यासचे अध्यक्ष म्हणून श्री. चंद्र कार्यरत होते. सन २००८ ते २०१५ या कालावधीत ते केंद्र शासनाच्या सेवेत प्रतिनियुक्तीवर होते. या काळात श्री. चंद्र यांनी पोलाद मंत्रालयाचे सहसचिव व ऊर्जा मंत्रालयाचे संचालक म्हणून काम पाहिले आहे.

◆◆◆

## जनसंपर्क अधिकारी श्री. ज्ञानेश्वर आर्दड सन्मानित



जनसंपर्क अधिकारी श्री. ज्ञानेश्वर आर्दड यांना पत्रमहर्षी स्व. मोहनलालजी बियाणी कार्यगौरव पुरस्कार प्रदान करताना सहकार मंत्री ना. श्री. अतुल सावे, सोबत मान्यवर.

छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे जनसंपर्क अधिकारी श्री. ज्ञानेश्वर आर्दड यांना राज्याचे सहकारमंत्री ना. श्री. अतुल सावे यांच्या हस्ते पत्रमहर्षी स्व. मोहनलालजी बियाणी कार्यगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व दैनिक मराठवाडा साथीच्यावतीने छत्रपती संभाजीनगर येथे एका खास समारंभात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या राज्यभरातील पत्रकारांसह विविध अधिकाऱ्यांनाही सन्मानित करण्यात आले. महावितरणमधील जनसंपर्काच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी श्री.आर्दड यांना पुरस्कार देण्यात आला. कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष श्री. वसंत मुंडे, विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष श्री. प्रमोद डोईफोडे, दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक श्री. चंदुलाल बियाणी, संपादक श्री. जगदीश बियाणी, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

हा पुरस्कार म्हणजे, प्रचार-प्रसारासाठी महावितरणच्या जनसंपर्क विभागामार्फत केल्या जाणाऱ्या विविध कामांचा गौरव असल्याची भावना श्री. आर्दड यांनी व्यक्त केली. पुरस्काराबद्दल श्री. आर्दड यांचे छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. मंगेश गोंदावले, मुख्य अभियंता श्री. सचिन तालेवार यांच्यासह अधिकारी-कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

◆◆◆

**Printed & Published by Shri. Anil M. Kamble** of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32,
N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 2300 2574
& **Published at** Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001.
***The Company accepts no responsibility for the matter published in the journal.***

संपादकः अनिल मु. कांबळे
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता,
प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)